ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बावत.(श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लौकी तालुका कोपरगाव)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र ८०५८९७

दिनांक - ०७ / ०७ /२०२५

संदर्भ :- १.या कार्यालयाचे आदेश साप्रवि-२/ग्रांप३/७००/२०१५/दिनांक १०/०७/२०१५ ( सेवानिलंबन आदेश)

२.मा.अपर आयुक्त नाशिक यांचे कडील अपील निर्णय क्र.४२/२०२२दिनांक ०५/०४/२०२३

३. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि२/ग्रांपं-३/६२८/२०२३ अ.नगर दिनांक २२/०८/२०२३( दिनांक ०९/०५/२०२२ च्या सेवेतुन काढून टाकणेचे आदेशाचे तारखेपासुन मानीव निलंवन समजणे )

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (५)

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१९११/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११

७. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. विप्रआ-१११२/प्र.क्रं.८२/११-अ. दि.२० एप्रिल २०१३

८. महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निप्रआ११८/प्र.क्र.११/११अ, दिनांक- ०९/०७/२०१९

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड , तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लौकी तालुका कोपरगांव यांना कार्यालयीन कामकाजात कायम स्वरुपी अहपहार व संशयीत अपहार करण्याचे गैरवर्तन केल्याने विभागीय चौकशी करुन जिल्हा परिषद सेवेतुन काढून टाकण्याची शिक्षा अंतिम करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०२ अन्वये मा.अपर आयुक्त नाशिक यांचे कडील त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेच्या अपिलाचा निर्णय प्राप्त झालेला असुन त्या अनुषंगाने सदर शिक्षेचा आदेश रदद करण्यात आलेला आहे. त्यानुसार संदर्भ ०४ क्रमांक अन्वये श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड यांना वाजवी संधी देण्यासाठी व प्रकरणी फेर आदेश होईपर्यंत जिल्हा परिषद सेवेत मानीव सेवानिलंवन ठेवून पंचायत समिती कोपरगाव हे मुख्यालय देण्यात आले आहे.

श्रीम.गायकवाड यांचे दोषारोप प्रकरणी मा.अपर आयुक्त नाशिक यांनी त्यांचे अपिलात सेवेतुन काढून टाकण्याचे आदेश रदद केल्याने प्रकरणी पुढील फेर आदेश पारीत करणेसाठी पुन:श्च विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली होती त्या बाबचा चौकशी अहवाल जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला असुन दोषसिध्दीच्या प्रमाणात फेर आदेश परित करणे सदयस्थितीत घेणे बाकी आहे.

संदर्भ क्रमांक ०८ चे शासन निर्णयानुसार श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड, सेवा निलंवीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा मानीव सेवा निलंवन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने,तसेच प्रकरणी फेर आदेश परित करणे सदयस्थितीत बाकी आहे.

श्रीम.गायकवाड यांचे सेवानिलबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन या निलंवन प्रकरणी श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड यांचे सेवानिलंवन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लौकी तालुका कोपरगांव यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती संगमनेर----- येथे पुन:स्थापित करीत आहे.

तसेच श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी समिती कोपरगाव यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202507010601001 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 01-07-2025 17:01:56
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड , तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लोंकी तालुका कोपरगांव
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगांव
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगांव
२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर
२/- श्रीम.काजलकिरण कमलाकर गायकवाड सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.